## सोपेकॉम आणि मकाम आयोजित एकदिवसीय चर्चासत्र

# ‘शेती क्षेत्रातील महिलांवर होणारा हिंसाचार’

### दिनांक १८ एप्रिल २०२४ ‘इंडियन मेडिकल असोसिएशन सभागृह’, परभणी

‘शेती क्षेत्रातील महिलांवर होणारा हिंसाचार’ हे एक दिवसीय चर्चासत्र सोपेकॉम (पुणे), आणि महिला किसान अधिकार मंच (मकाम), ह्यांनी परभणी मधील ‘इंडियन मेडिकल असोसिएशन सभागृह’ इथे दिनांक १८ एप्रिल २०२४ रोजी आयोजित केले होते. चर्चासत्रासाठी सुमारे १५० शेतकरी महिला, सरकारी अधिकारी तसेच सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. चर्चासत्राच्या उद्‌घाटनाला जिल्हा महिला बाल विकास अधिकारी श्री के. व्ही. तिडके आणि कृषी अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या विभाग प्रमुख डॉ स्मिता सोळंकी उपस्थित होते. मान्यवरांनी रोपाला पाणी घालून आणि सोपेकॉमने केलेल्या अभ्यासातील परभणी जिल्हाच्या अहवालाचे प्रकाशन करून चर्चासत्राचे उद्‌घाटन केले. उद्‌घाटन सत्राचे प्रास्ताविक आणि पाहुण्यांचे स्वागत सोपेकॉमच्या सीमा कुलकर्णी यांनी केले. पुढे महिला प्रतिनिधी पल्लवी साळवे यांनी ग्रामीण भागातील शेती क्षेत्रामध्ये होत असलेल्या महिला हिंसाचाराच्या स्वरूपाची मांडणी केली.




त्यानंतर, सत्राचे प्रमुख पाहुणे मा. के. व्ही. तिडके (जिल्हा महिला बाल विकास अधिकारी, परभणी) यांनी महिलांना उद्देशून बोलताना म्हटले की महिलांचा जमिनीवर अधिकार असायला पाहिजे. मुलींनी त्यांचे अधिकार मिळवायला पाहिजे तसेच आई-वडिलांनी सुद्धा त्यांच्या मुलींना समान अधिकार दिला पाहिजे. तसेच त्यांनी परभणी जिल्ह्यातील बाल विवाहाच्या वाढलेल्या प्रमाणावर बोलताना म्हटले की मुलींचे बालविवाह थांबवायला पाहिजेत. त्यासाठी जीमबा सतत कार्य करीत आहे आणि मागील दोन वर्षामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये बालविवाह थांबवण्याचे कार्य त्यांच्या विभागामार्फत केले गेले आहे. कामाच्या ठिकाणी होत असलेल्या हिंसेचा तसेच कौटुंबिक हिंसेचा सामना करताना न घाबरता महिलांनी तक्रार करायला पाहिजे. गरज पडल्यास महिला व मुलांकरिता असलेल्या टोल-फ्री हेल्प लाइन नंबर वर संपर्क करायला हवा असे त्यांनी महिलांना उद्देशून सांगितले.





डॉ स्मिता सोळंकी, विभाग प्रमुख, कृषी अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय, यांनी सुद्धा महिला शेतकऱ्यांना उद्देशून म्हटले की महिलांनी त्यांच्या अधिकारासाठी एकत्रित यायला हवे. तसेच लिंगभाव समानतेची सुरवात घरापासून करावी. हिंसेचा विरोध दर्शवण्यासाठी संघटीत व्हावे. तसेच महिलांनी कौशल्य विकास करण्यावर लक्ष घालावे आणि शेतीशी संबंधित योजनांचा लाभ घेऊन आर्थिक बल वाढवावे. शेतीसंबंधित विविध अवजारांचे प्रशिक्षण घेऊन महिलांनी त्याचा उपयोग अर्थार्जनासाठी करावा असेही त्यांनी सुचवले. त्यासाठी लागणारे प्रशिक्षण त्यांच्या विभागामार्फत

मोफत दिले जाईल आणि पुढे त्याचा कसा उपयोग महिलांना करता येईल यासाठी सुद्धा प्रशिक्षणे दिले जातील असे आश्वासन त्यांनी दिले.  मकामचे प्रतिनिधी श्री. शंकर नागसाखरे यांनी मान्यवरांचे आभार मानले.

### सत्र दुसरे : घरगुती व कामाच्या ठिकाणी होणारी हिंसा: सद्य परिस्थिती

या सत्राचे सत्र-नियंत्रण मकाम चे प्रतिनिधी श्री. राजू केंढे यांनी केले. यामध्ये सोपेकॉमच्या स्नेहा भट यांनी सोपेकॉम



आणि मकाम ने 'शेती मधील अरिष्ट आणि महिलांवर होणारा हिंसाचार' ह्या विषयावर केलेल्या अभ्यासातून समोर आलेल्या निष्कर्षांची मांडणी केली. त्यांनी त्यांच्या मांडणीमध्ये, परभणी तालुक्यात २९७ महिलांसोबत करण्यात आलेल्या अभ्यासातील महत्वाचे मुद्दे समोर ठेवले. ह्या अभ्यासातून शेती आणि शेतमजुरी करणाऱ्या महिलांना येणाऱ्या विविध अडचणी समोर आल्या. अभ्यास केलेल्या बहुतेक सर्व महिला सीमांत आणि छोट्या शेतकरी होत्या. पिकाची एकसुरी पद्धत, हवामान बदलामुळे शेतीवर होणारे परिणाम, कामाची अनुपलब्धता, बिनमोलाच्या कामाचे वाढलेले ओझे, वाढता कर्जबाजारीपणा, अन्न आणि पोषण असुरक्षितता, आरोग्यावर होणारे परिणाम ह्यासंबंधी त्यांनी चर्चा केली. अभ्यासातून एकट्या महिला, संसाधनहीन जाती-जमातींमधील महिला ह्यांना येणारे हिंसाचाराचे अनुभव अधिकच गंभीर असतात हे समोर येत आहे त्याबद्दल मांडणी केली. त्यानंतर महिला प्रतिनिधी म्हणून कालिंदा सुतारे यांनी अनुभव मांडले. त्यानंतर महिला व मुलांसाठी विशेष सहाय्य कक्षाच्या प्रतिनिधी सोनी गवारे आणि पिंकी काशिंदे यांनी त्यांच्याकडे महिला ज्या केसेस घेऊन येतात त्या आधारे जिल्ह्यातील महिलांचे काय अनुभव आहेत त्याबद्दल मांडणी केली.






सत्राच्या अध्यक्ष डॉ जया बंगाळे, असोसिएट डीन आणि प्राचार्य, कॉलेज ऑफ कम्युनिटी सायन्स, वी.एन.एम.के. विद्यापीठ परभणी यांनी शारीरिक, आर्थिक, मानसिक आणि लैंगिक हिंसाचाराच्या व्याख्यांच्या आधारे जिल्ह्यामध्ये कौटुंबिक हिंसाचाराची एकूणच स्थिती काय आहे यावर विचार मांडले. महिलांना उद्देशून सांगितले की अत्याचार सहन करण्यापेक्षा यंत्रणेची मदत घेत स्वतःची सुरक्षा करावी. श्री. राजू केंढे यांनी सत्राचा समारोप केला.

### सत्र तिसरे : पुढील दिशा आणि समारोप

या सत्रामध्ये अध्यक्ष म्हणून प्रा. सारंग साळवी (विकल्प इंडिया) होते. अर्चना मेश्राम (बाल कल्याण समिती, सदस्य आणि सिद्धेश्वरी शैक्षणिक-सामाजिक संस्था, परभणी), ॲड. मिताली मोतीकर (विधी सल्लागार, जीमबा), नंदा गायकवाड (जनवादी विकास संस्था), महिला प्रतिनिधी सत्यशीला ठेंगे, आणि सोपेकॉम च्या सीमा कुलकर्णी उपस्थित होत्या. सत्राचे सत्र नियंत्रण स्नेहा भट यांनी केले. अर्चना मेश्राम यांनी त्यांच्या मांडणीत सांगितले की महिलांनी हिंसेचा विरोध दर्शवणे गरजेचे आहे. तसेच संपत्तीचे समान वाटप होणे गरजेचे आहे. त्यासोबतच त्यांनी महिला आणि बाल सुरक्षेसंदर्भात बोलताना सांगितले की महिलांनी कोणतीही भीती न बाळगता यंत्रणेकडे धाव घ्यावी. तसेच बाल सुरक्षेसाठी असलेल्या यंत्रणेची माहिती त्यांनी महिलांना दिली.

त्याचबरोबर, ॲड.मिताली मोतीकर यांनी महिलांकरिता उपलब्ध असलेल्या विधिसेवा बद्दल महिलांना माहिती दिली आणि महिलांना आवाहन केले की हिंसा सहन करीत जगू नये तर त्याविरोधात तक्रार करायला पाहिजे. पुढील दिशेच्या अनुषंगाने बोलताना त्या म्हणाल्या की शेतकरी महिलांच्या दृष्टीने विधिसेवा मध्ये पुनर्विचार व्हायला पाहिजे. सत्यशीला ठेंगे यांनी त्यांचे हिंसेचे अनुभव सर्वांसमोर मांडले. तर नंदा गायकवाड यांनी महिलांना उद्देशून सुचवले



की संघटीत होऊन हिंसेच्या विरोध दर्शवला पाहिजे. तसेच स्थानिक पातळीवरील यंत्रणेपर्यंत पोहोचून त्यांचे प्रश्न सोडवण्याचा पूर्ण प्रयत्न करावा.

सत्राचे अध्यक्ष, प्रा. सारंग साळवी यांनी पुढील दिशेच्या अनुषंगाने मांडणी करताना सांगितले की योजनांबद्दल महिलांना अधिक माहिती देण्यासाठी कार्यशाळा घेण्यात याव्या ज्यामुळे महिलांना योजनांचा लाभ घेता येईल आणि प्रक्रिया सुद्धा समजेल. बाल आणि महिला सुरक्षिततेच्या दृष्टीने बालविवाह, वेश्याव्यवसाय, मानवी तस्करी थांबवणे गरजेचे आहे त्यासाठी यंत्रणेने योग्य पद्धतीने कार्य करायला पाहिजे असेही त्यांनी सुचवले. त्यासोबतच शासनासमोर महिला शेतकऱ्यांचे प्रश्न मांडणे आणि लॉबिंग करणे गरजेचे आहे आणि ते केले गेले पाहिजे असे विचार त्यांनी मांडले. तसेच महिलांचे मनोबल वाढवणे गरजेचे आहे त्यासाठी काही कृतिकार्यक्रम घेणे आणि त्यांच्या सक्षमीकरणाची प्रक्रिया राबवणे गरजेचे आहे त्याशिवाय महिला पुढे येणार नाही. समुपदेशन केंद्राची गरज महिलां-पुरुषांकरीता आहे आणि सामाजिक संस्थांनी त्या दृष्टीने कार्य केले पाहिजे जेणेकरून प्रामुख्याने महिलांचे मनोबल वाढेल आणि हिंसेला त्या विरोध दर्शवू शकतील.



पुढे सीमा कुलकर्णी यांनी सत्राचे समारोपीय भाष्य केले, त्यात त्यांनी महिलांसमोर काही प्रश्न उपस्थित केले आणि सांगितले की दिलेल्या माहितीपत्रिका त्यांनी वाचाव्यात. त्यातील मुद्दे समजून घ्यावे आणि शेतकरी महिलांनी हिंसा होत असल्यास त्या संदर्भात वाचा फोडावी आणि तक्रार करण्यास पुढे यावे. सोपेकॉम आणि इतर संस्थांनी तयार केलेल्या पोस्टर बद्दल थोडक्यात ओळख त्यांनी महिलांना करून दिली. तसेच, जमिनीवरील समान अधिकार मिळण्यासाठी महिलांनी पुढाकार घ्यायला पाहिजे आणि सरकार समोर आपले प्रश्न मांडले पाहिजेत, असे त्यांनी महिलांना सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोपेकॉमच्या ऋचा वसुमती सतीष ह्यांनी केले.

